RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक २६] बुधवार, मार्च ८, २०१७/फाल्गुन १७, शके १९३८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ मार्च २०१७

### अधिसूचना

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१.

क्रमांक झोपसु-१००८/प्र.क्र.१४३(१)/झोपसु-१.—महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा. २८) याच्या कलम ३५ चे पोट-कलम (१अ) आणि महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (तक्रार निवारण समिती) नियम, २०१५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, उक्त कलम ३५ चे पोट-कलम (१अ) च्या प्रयोजनासाठी यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली तक्रार निवारण समिती गठित करीत असून यामध्ये तिच्या समोरील स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अध्यक्षाचा व सदस्यांचा आणि स्तंभ (४) मध्ये अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राचा व स्तंभ (५) मध्ये सदर समितीच्या कार्यकक्षेचा समावेश होतो.

## अनुसूची

| अ. क्र. (१) | तक्रार निवारण समिती (२) | अध्यक्ष व एकूण सदस्य संख्या (३) | समितीचे क्षेत्र (४) | समितीची कार्यकक्षा (५) |
|---|---|---|---|---|
| १ | शिखर तक्रार निवारण समिती<br>(अ) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण विभाग)- अध्यक्ष<br>(ब) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (म्हाडा)-सदस्य.<br>(क) मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा, मुंबई)-सदस्य.<br>(ड) आयुक्त, बृहन्मुंबई मनपा यांनी प्राधिकृत केलेले अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई मनपा-सदस्य.<br>(इ) आयुक्त, एमएमआरडीए यांनी प्राधिकृत केलेले अतिरिक्त आयुक्त, एमएमआरडीए-सदस्य. | अध्यक्ष-१<br>सदस्य-४ | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(अ) नुसार राज्यातील सर्व घोषीत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची क्षेत्रे. | (अ) संबंधित विकास नियंत्रण नियमावली व महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाविरुद्धची अपिले.<br>(ब) राज्य शासनाने विवक्षित आदेशान्वये सोपविलेली कोणतीही प्रकरणे<br>(क) मा. सर्वोच्च न्यायालयाने अथवा मा. उच्च न्यायालयाने सोपविलेली प्रकरणे.<br>(ड) इतर तक्रार निवारण समितीसमोर सोपविण्यात न आलेल्या विषयांची प्रकरणे.<br>(इ) राज्य शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित होणाऱ्या इतर सर्व तक्रार निवारण समित्यांचे प्रशासकीय नियंत्रण व समन्वय. |
| २ | तक्रार निवारण समिती (मुंबई शहर)<br>(अ) अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे-अध्यक्ष.<br>(ब) सह मुख्य अधिकारी (म्हाडा, मुंबई मंडळ)-सदस्य.<br>(क) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका)-सदस्य. | अध्यक्ष-१<br>सदस्य-२ | मुंबई शहरातील सर्व क्षेत्र. | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३५(१अ) (अ) अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने |

अनुसूची - चालू

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | पारित केलेला आदेश वगळता व कलम ३५(१अ)(ब) मध्ये नमूद केलेल्या झोपडीधारकाच्या पात्रतेसंबंधी उपस्थित झालेले सर्व वाद. |
| ३ | तक्रार निवारण समिती (मुंबई उपनगर)<br>(अ) अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई शहर - अध्यक्ष<br>(ब) सह मुख्य अधिकारी (म्हाडा, दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ) सदस्य.<br>(क) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका)-सदस्य. | अध्यक्ष - १<br>सदस्य - २ | मुंबई उपनगरातील सर्व क्षेत्र | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३५(१अ)(अ) अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांने पारित केलेला आदेश वगळता व कलम ३५(१अ)(ब) मध्ये नमूद केलेल्या झोपडीधारकाच्या पात्रतेसंबंधी उपस्थित झालेले सर्व वाद. |
| ४ | तक्रार निवारण समिती (ठाणे शहर)<br>(अ) अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे-अध्यक्ष.<br>(ब) सह मुख्य अधिकारी (म्हाडा, कोकण मंडळ) - सदस्य.<br>(क) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त (ठाणे महानगरपालिका)-सदस्य. | अध्यक्ष - १<br>सदस्य - २ | ठाणे शहरातील सर्व क्षेत्र | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३५(१अ)(अ) अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांने पारित केलेला आदेश वगळता व कलम ३५(१अ)(ब) मध्ये नमूद केलेल्या झोपडीधारकाच्या पात्रतेसंबंधी उपस्थित झालेले सर्व वाद. |

अनुसूची --समाप्त

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | तक्रार निवारण समिती (पुणे शहर)<br>(अ) विभागीय आयुक्त, पुणे यांनी प्राधिकृत केलेला त्यांच्या कार्यालयातील अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचा उपायुक्त - अध्यक्ष<br>(ब) सह मुख्य अधिकारी (म्हाडा, पुणे मंडळ)-सदस्य.<br>(क) आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त, पुणे महानगरपालिका-सदस्य. | अध्यक्ष - १<br>सदस्य - २ | पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका मधील सर्व क्षेत्र. | महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३५(१अ)(अ) अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने पारित केलेला आदेश वगळता व कलम ३५(१अ)(ब) मध्ये नमूद केलेल्या झोपडीधारकाच्या पात्रतेसंबंधी उपस्थित झालेले सर्व वाद. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. कों. धनावडे,**
शासनाचे उप सचिव.